


एकूणच बाह्यचित्रीकरण हा दिग्दर्शकाच्या डोकेदुखीचा विषय. त्यातून त्या चित्रीकरणात प्राणी वापरायचे झाले तर?

□ नरेंद्र उपाध्याय

*शिकारी*च्या सेटवर हत्तीने गुलशन ग्रोव्हरला सोंडेत उचलून फेकलं तेव्हा गुलशनची दांडी गुल झाली.

बाह्यचित्रीकरणात प्राणी


म्हणजे भरोशाच्या म्हशीचे...

महाबळेश्वरच्या डोंगराळ भागात *खतरा*चं शूटिंग सुरू होतं. अचानक दिग्दर्शकाला आठवलं की, त्या दृश्याचं अर्ध चित्रीकरण मुंबईत झालेलं आहे. आणि त्यात एक बकरा होता, तोही पांढरा शुभ्र. मग उरलेलं चित्रीकरण बकऱ्याशिवाय कसं पूर्ण करणार? झालं, त्याने युनिटच्या लोकांना पांढऱ्या बकऱ्याच्या शोधात दाही दिशांना पिटाळलं.


चार तासांच्या अथक शोधानंतर एक बकरा मिळाला, पण काळ्या रंगाचा. दुसरा काहीच पर्याय नसल्याने मग त्या काळ्या बकऱ्याला पांढरा रंग फासून वेळ भागवायचं ठरवलं. पण रंगाचा वास आणि त्वचेला होणारी विचित्र जाणीव यामुळे बकरा बिथरला. त्याला सारख्या शिंक येऊ लागल्या. इकडे तिकडे धावाधाव करून आणि अंग झटकून त्याने इतरांच्या अंगावर पांढरा रंग उडवला.

आऊटडोअरला प्राण्यांचं चित्रीकरण करणं फार जिकीरीचं असतं. अनेकदा ते प्राणी शूटिंगच्या वातावरणाला, गर्दीला पाहून बिथरतात. त्यामुळे युनिट आणि कलाकारांची त्रेधा तिरपिट उडते. जेसलमेरच्या वाळवंटात *रझिया सुलतान*चं चित्रीकरण चालू होतं. त्यावेळी एका उंटामुळे बिकट परिस्थिती निर्माण झाली. वाळूच्या वादळाचा फायदा घेऊन हेमामालिनी उंटावरून पळ काढते असा शॉट होता. दृश्य चित्रीत करताना वाळूच्या कृत्रिम वादळाला उंट घाबरला. तो भारत-पाक सीमेच्या दिशेने पळू लागला. त्याला वेळीच पकडलं नसतं तर बिनापासपोर्ट पाकिस्तानच्या हद्दीत दाखल झाल्याचा आरोप हेमामालिनीवर करण्यात आला असता. सुदैवाने त्याला सीमारेषेच्या अलिकडेच पकडण्यात आलं.

माकडांसह चित्रीकरण करण्यात किती अडचण असते, ते प्रत्यक्ष त्या अनुभवातून गेल्याशिवाय समजत नाही. *करिश्मा कुदरत*







ही दृश्य पाहताना माकडांच्या हुशारीचं कौतुक वाटतं, पण ती टिपणाऱ्या युनिटला माकडं कशी हवालदिल करतात हे स्वतः अनुभवल्याशिवाय कळणार नाही.


काच्या सेटवर टीना मुनिमने तो अनुभव घेतला. टीनाच्या खांद्यावर माकडाला बसवून शॉट द्यायचा होता. खांद्यावर बसवताच माकडाने टीनाच्या केसांची क्लिप काढून चावायला सुरुवात केली. तिला दुसरी क्लिप देण्यात आली, त्याचंही मर्कटराजाने तेच केलं. असं एक दोनदा नाही तर चौदा वेळा झालं. चौदा क्लिप्स चावल्यावर मग कुठे माकड शांत झालं आणि त्याने तो शॉट दिला.

*मैं बलवान*च्या शूटिंगदरम्यान जोधपूरच्या उमेद पॅलेसमध्ये एका माकडाने असाच उच्छाद मांडला होता. मिथुन आणि धर्मेंद्र यांच्याबरोबर माकडही शूटिंग करत होतं. एका दृश्यात अर्ध्यातूनच त्याने पळ काढला आणि त्या खोलीच्या खिडकीतून बाहेर जाऊन पॅलेसच्या गच्चीवर पोहोचलं. दीड तास पकडापकडीचा खेळ झाल्यावर मग कुठे त्या माकडाला ताब्यात घेण्यात त्यांना यश आलं.

एका माकडाची ही अवस्था, तर मग एका वेळी चारशे माकडांना एकत्र घेऊन काम करायचं झालं तर? युनिटचे काय हाल होत असतील याची कल्पनाच केलेली बरी. बँगलोरच्या लोकेशनवर दिग्दर्शक के. सी. बोकाडिया *जबाब हम देंगे*चं शूटिंग करत होते. त्यात चारशे माकडं घेतली होती. तो भयंकर अनुभव बोकाडिया आजही विसरू शकणार नाहीत. क्लायमॅक्सचं शूटिंग होतं. त्या तीन दिवसांत किती माकडं पळून गेली त्याचा हिशोब नव्हता. अनेकांनी युनिटच्या सदस्यांवर हल्ला करून जखमी केलं.

मुके प्राणीही माणसाइतकेच हळवे

मैं तुम्हारा दुश्मनमध्ये जया प्रदाला आशिर्वाद देणाऱ्या हत्तीकडे कौतुकाने पाहणारा जॅकी



रझिया सुलतानच्या सेटवर हेमाला उंटाने सीमेपार पाठवण्याची पूर्ण तयारी केली होती.



असतात. *होगी प्यार की जीत*च्या लोकेशनवर त्याचा अनुभव आला. उटीजवळ मेट्टापलायम गावात शूटिंग सुरू होतं. एका जत्रेचा शॉट होता. त्यासाठी देखणा सेटही उभारण्यात आला होता. त्या जत्रेत काही पाळीव प्राणी वावरताना दाखवायचे होते. गावातूनच ते प्राणी भाड्याने घेण्यात आले. जत्रेचं शूटिंग सुरू झालं तोच एका गायीने दावण तोडून इतस्ततः पळापळ करायला सुरुवात केली. धावाधाव करून तिला पकडलं. चौकशी करता समजलं की, त्या गाईच्या पाडसालाही चित्रीकरणासाठी आणण्यात आलं होतं. ते वासरू तिथेच कुठेतरी होतं. आपल्या बछड्याच्या विरहाने व्याकूळ झालेली गाय त्याचा शोध घेण्यासाठी दावण सोडून पळायला लागली होती. हे लक्षात येताच तातडीने तिचं वासरू त्याठिकाणी आणण्यात आलं. त्याला पाहून ती गाय एकदम शांत झाली.

एरव्ही शांत वाटणारा हत्तीही सैरभैर होऊ शकतो. *शिकारी*च्या शूटिंगदरम्यान हत्तीने शिकवल्याप्रमाणे गुलशन ग्रोव्हरला सोंडेत उचललं खरं, पण त्याला पुन्हा अलगद खाली उतरवण्याऐवजी वर हवेतच सोडून दिलं. इतक्या उंचीवरून जमिनीवर आपटलेल्या गुलशनच्या किती हाडांचा चुरा झाला ते त्यालाच माहीत. *सफेद हाथी*च्या सेटवरही हत्तीने त्या बकऱ्याप्रमाणेच अंगाला रंग चोपडला म्हणून धुमाकूळ घातला होता.

प्रत्येकवेळी प्राणी त्रासदायकच ठरतात असंही नाही. काही वेळा ते मदतरूपही ठरतात. *नन्हा शिकारी*चं शूटिंग मधुमलाईच्या जंगलात चालू होतं. त्या ठिकाणी एक पाळीव वाघ आणण्यात आला होता. जंगलाच्या मध्यभागी उंच गोलाकार बांबूचा वाडा उभारण्यात आला होता. त्याच्या आत शूटिंग सुरू होतं. एक दिवस सकाळच्या वेळी युनिट वाड्याजवळ पोहोचलं तेव्हा तिथे जंगली कुत्र्यांच्या भुंकण्याचा आवाज येऊ लागला. ते कुठे वाड्याच्या आत दबा धरून बसले होते. त्यांना तिथून बाहेर काढण्यात मोठी जोखीम होती. वाघाच्या प्रशिक्षकाला एक युक्ती सुचली. वाघाचा पिंजरा वाड्याच्या दारापाशी आणण्यात आला. पिंजऱ्याची झडप काढल्याबरोबर वाघाने आता प्रवेश केला आणि एक जोरदार डरकाळी फोडली. त्यासरशी तिथे दबा धरून बसलेले जंगली कुत्रे शेपूट घालून पळून गेले. वाघाच्या या कामगिरीमुळे त्या दिवसाचं शूटिंग निर्वेध पार पडलं.



*तेरी मेहरबानिया*मध्ये पूनम धिल्लाँनसह मोती कुत्राः मेरी मेहरबानिया



जंगली पशुंसह असा शॉट देताना भल्या भल्यांची भंबेरी उडते.

खंडाळ्याच्या लोकेशनवर *आखरी गोली*चं शूटिंग चालू असताना पाच-सहा हिंसक डॉबरमॅन जातीचे कुत्रे अमजद खानवर चालून जातात असं दृश्य होतं. अर्थात, शॉटसाठी अमजद खानचा डमी तयार होता. सीन सुरू झाला, कुत्र्यांनी पाठलाग सुरू केला. ठरलेल्या सीमेपर्यंत गेल्यावर शॉट ओके झाला. पण त्या डोंगराळ भागात भर दुपारच्या रणरणत्या उन्हाने कुत्रे वैतागले होते. कट म्हणूनही त्यांनी पाठलाग थांबवला नाही. बिचारा डुप्लिकेट, जीवाच्या आकांताने पळत होता. पळता पळता चटकन एका झाडावर चढला आणि त्या हिंसक कुत्र्यांच्या तावडीतून वाचला.

*भोलाभाला*च्या शूटिंगदरम्यान राजेश खन्ना घोड्यावरून पडतो असं दृश्य होतं. मात्र खाली पडलेल्या राजेश खन्नाने मागून येणाऱ्या घोड्यांच्या टाचेखाली चिरडलं जाऊ नये म्हणून त्वरेने हालचाल केली आणि जीव वाचवला. *उमराव जान*च्या लोकेशनवर घोडेस्वारी करणाऱ्या राज बब्बरला घोड्याने खाली फेकलं. *नया दिन नयी रात*च्या सेटवर संजीवकुमार वाघाबरोबर शूटिंग करत होता. वाघाचं तोंड बांधण्यात आलं होतं. तोंड बांधल्यामुळे चिडलेल्या वाघाने संजीवकुमारच्या गालावर पंजाने थप्पड मारली. त्याची नखं लागून संजीवकुमारच्या गालातून रक्त वाहू लागलं. त्याला ताबडतोब हॉस्पीटलला हलवलं. या दुर्घटनेची भीती संजीवकुमारच्या मनात मरेपर्यंत ताजी होती असं म्हणतात. ★